**तात्काळ/कालमर्यादा/महत्वाचे**

**क्र. पोमसं/३१/३९-१/घबांअ/२०१८-१९/७२/२०१८** **मुंबई, दिनांक ३१/०३/२०२२**

## आदेश

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. बीयुडी ०४२१/प्र.क्र.११९/आस्था-१, दि.०२/०२/२०२२ अन्वये सन २०२१-२०२२ या /वित्तीय वर्षासाठी शासनाने ५० टक्के च्या मर्यादेत रक्कम रु. १२,५०,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये बारा कोटी पंन्नास लाख फक्त) घरबांधणी अग्रीमाकरिता बीडीएस प्रणालीवर उपलब्ध करुन दिले आहेत. सदर आदेशान्वये रु.५०,००,०००/- ( अक्षरी रुपये पंन्नास लाख फक्त ) एवढया रकमेस मंजूरी देण्यात येत आहे. विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखांनी केलेल्या मागणीनुसार जिल्हा कोषागार, आहरण व संवितरण क्रमांक या खाली स्वतंत्रपणे अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे निधी वितरीत करण्यात येत आहे.

२. **सोबतच्या विवरणपत्रातील अ.क्र. १ ते ६ वरील अग्रीमधारकांना त्यांनी एकरकमी मागणी केल्यानुसार एकूण रक्कम रु.५०,००,०००/- ( अक्षरी रुपये पंन्नास लाख फक्त ) वितरीत करण्यात येत आहे.**

३. सोबतच्या विवरणपत्रातील रकाना क्र. ७ मध्ये दर्शविलेल्या विभाग प्रमुखांनी शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्रक्र-३०/२०१३/विनियम,भाग-२, दि.१७/४/२०१५ अन्वये मुंबई वित्तीय नियम १९५९ अंतर्गत नियमाखाली प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका - १९७८ भाग पहिला उपविभाग - एक मधील अनुक्रमांक ११ नियम १३४ अन्वये संबधित अधिकारी / कर्मचा-यांचे घरबांधणी अग्रिम मंजूर केल्याचे आदेश निर्गमित करावेत.

४. घटक प्रमुखांनी त्यांना वितरीत केलेल्या निधीचा विनियोग संपूर्णत: न केल्यास किंवा निधी व्यपगत झाल्यास त्याची सविस्तर कारणे शासनास व लोकलेखा समितीस सादर करावी लागतात, त्यामुळे निर्देश देण्यात येत आहेत. की, कार्यालय प्रमुखांनी संबंधित कोषागार कार्यालयास त्यासंबंधीची देयके सादर करुन सदरची देयके दि.**३१.०३.२०२२** पर्यंत कोणत्याही परिस्थितीत पारित करुन घ्यावीत. तसेच संबंधीत अधिकारी / कर्मचाऱ्यांना घरबांधणी अग्रीम अदा करणेची सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित घटक प्रमुखांची असल्यामुळे त्यांनी सदर प्रकरणांची तातडी व गांभीर्य लक्षात घेऊन या प्रकरणी वैयक्तिकरित्या लक्ष देऊन त्यांचे कार्यालयातील लेखाविषयक कामकाज करणारे लेखा अधिकारी / सहाय्यक लेखा अधिकारी / लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना त्याप्रमाणे विहीत कालावधीत अचूक व परिपूर्ण कामे करण्याबाबत सक्त सूचना द्याव्यात. जेणेकरुन शासनाने चिन्हांकित करून दिलेल्या निधीचा विनियोग पूर्णत: होईल संबंधीतांना घरबांधणी अग्रिम रक्कम अदा केल्यानंतर त्यांची दिनांकित अदारोल पावती, देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक या कार्यालयास / शासनास व महालेखापाल- १ मुंबई / महालेखापाल-२ नागपूर / अधिदान व लेखा कार्यालय मुंबई यांना सादर करावा. शासन निर्णय, वित्त विभाग दि.२०/०२/२०१५ मधील परि. ८ (८) आणि शासन निर्णय वित्त विभाग क्र.अग्रिम-१०००/प्र.क्र.१३/२०००/विनियम, दि.०५/०९/२००० मधील विहीत नमुन्यात याबाबतची नोंद अग्रीम धारकाच्या सेवापुस्तकात/ सेवापटात न चुकता घेण्यात यावी.

५. असेही निर्देश देण्यात येत आहेत की, उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेच्या खर्चाचा ताळमेळ, महालेखापाल यांचे कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी / महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण - १४ मधील नियम १५७ च्या परिशिष्ट ३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती, शासनास विहीत मुदतीत पाठविण्यात यावी. शासनाने चिन्हांकित करुन दिलेल्या निधीनुसार या कार्यालयाने मंजूर केलेल्या अग्रिमाच्या खर्च मेळ्याची प्रमाणित माहिती महालेखापाल यांचे कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची **संपूर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.** तथापि, त्याप्रमाणे माहिती न पाठविल्यास कार्यालयातील संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करणे भाग पडेल याची कृपया नोंद घ्यावी. प्रमाणित न केलेली माहिती स्वीकारण्यात येणार नाही. या कारणामुळे विलंब झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

Deks/thispc/acer d/hba order draft

६. शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना अग्रिमाचे **दुबार वाटप** होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे अग्रिमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला, अन्य विभाग / कार्यालयात बदली झाली तरीही शासन निर्णय, वित्त विभाग दि.२०/०२/२०१५ मधील परि.८ (१२) नुसार घरबांधणी अग्रीम रकमेच्या आणि व्याजाच्या नियमीत व योग्य वसुलीसाठी संबंधित अग्रीमधारक स्वत: जबाबदार राहील असे अग्रीमाधारकास अवगत करावे. अर्जदारास मंजूर केलेला अग्रीम ज्या प्रयोजनाकरिता मंजूर केला आहे त्या कारणाकरिताच त्याने खर्च केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र (कंत्राटदार यांची रक्कम मिळाल्याची पावती) या कार्यालयास एक महिन्याच्या आत सादर करावी.

७. सदरचा खर्च सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षातील गृह विभाग मागणी क्र. बी-११ मुख्यलेखाशिर्ष ७६१० - शासकीय कर्मचारी इ.कर्जे मधील गौणशिर्ष २०१- घरबांधणी अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०००८७) अन्वये खर्च करण्यात यावा व वित्तीय वर्ष २०२१-२०२२ च्या मंजूर अनुदानातून करण्यात यावा. सदरचा खर्च याच लेखाशिर्षाखाली नोंदविला गेला आहे याची खातरजमा करण्यात यावी.

**(अनुप कुमार सिंह)**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, म.राज्य, मुंबई.

**प्रति,**

पोलीस अधीक्षक, नंदुरबार

Deks/thispc/acer d/hba order draft

**पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुख्यलेखाशिर्ष -७६१०, शासकिय कर्मचारी इत्यादींना कर्जे, वित्तीय वर्षे २०२१-२०२२**
**मागणी क्रमांक ११-बी गौणशिर्ष २०१, घरबाधंणी अग्रिम आदेश दि. ३१/०३/२०२२**

| अ.क्र | नाव | सेवार्थ क्रमांक | पदनाम | सेवाभरती दि. | सेवानिवृत्ती दि. | विभाग प्रमुख | घटक कार्यालय | एकुण मंजुर रक्कम | प्रत्यक्ष वितरीत करण्यात येणारी रककम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | **एक रकमी** | | | | | |
| १ | शहाराम नानासाहेब कचरे | DGPSNKM७९०४ | वश्रेलि | ०९.०३.२००५ | ३०.०६.२०३७ | पोलीस अधीक्षक, नंदुरबार | पोलीस अधीक्षक, नंदुरबार | २०,००,०००/- | एकरकमी २०,००,०००/- |
| २ | गणेश दिगंबर जव्हेरी | DGPGDJM८४०१ | वश्रेलि | ०५.०९.२००८ | ३१.०७.२०४२ | पोलीस अधीक्षक, नंदुरबार | पोलीस अधीक्षक, नंदुरबार | ६,००,०००/- | एकरकमी ६,००,०००/- |
| ३ | मनोगिर जगदिशगिर बुवा | DGPMJBM८४०१ | कश्रेलि | ०१.१२.२०१४ | ३१.११.२०४२ | पोलीस अधीक्षक, नंदुरबार | पोलीस अधीक्षक, नंदुरबार | ६,००,०००/- | एकरकमी ६,००,०००/- |
| ४ | बापु साहेबराव धनगर | DGPBSDM८४०२ | कश्रेलि | ०५.०५.२००९ | ३१.०१.२०४२ | पोलीस अधीक्षक, नंदुरबार | पोलीस अधीक्षक, नंदुरबार | ६,००,०००/- | एकरकमी ६,००,०००/- |
| ५ | नरेंद्र सुभाषसिंग परदेशी | DGPNSPM८५०३ | कश्रेलि | २२.०९.२००८ | ३१.१०.२०४५ | पोलीस अधीक्षक, नंदुरबार | पोलीस अधीक्षक, नंदुरबार | ६,००,०००/- | एकरकमी ६,००,०००/- |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | रविंद्र भिमराव शिंदे | DGPRBSM७९०१ | कार्या. शिपाई | १७.०३.२००१ | ३१.०१.२०३९ | पोलीस अधीक्षक, नंदुरबार | पोलीस अधीक्षक, नंदुरबार | ६,००,०००/- | एकरकमी ६,००,०००/- |
| | | | | | | | | | |
| १ | एकूण खर्च ( अक्षरी रुपये पंन्नास लाख फक्त ) | | | | | | | ५०,००,०००/- | |
| २ | सदर आदेश निर्गमित केल्यास अद्यापपर्यंत एकूण खर्च ( अक्षरी रुपये अकरा कोटी अडुसष्ट लाख सदतीस हजार पाचशे त्र्यान्नव फक्त ) | | | | | | | ११,६८,३७,५९३/- | |
| ३ | सदर आदेश निर्गमित करण्यापूर्वी उपलब्ध अनुदान ( अक्षरी रुपये एक कोटी बत्तीस लाख एक्केचाळीस हजार सातशे सत्त्याऐंशी फक्त ) | | | | | | | १,३२,४१,७८७/- | |
| ४ | सदर आदेश निर्गमित केल्यास शिल्लक अनुदान ( अक्षरी रुपये ब्याऐंशी लाख एक्केचाळीस हजार सातशे सत्त्याऐंशी फक्त ) | | | | | | | ८२,४१,७८७/- | |